**सरकारी वकीलांचे तोंडी विनंतीवरुन साक्ष ईनकॅमेरा नोंदविण्यात आली.**

**साक्षीदार क्र. ४**

**साक्षीदार अज्ञान असल्यामुळे शपथ न देता साक्ष नोंदविली.**

**नाव : प्रणाली दिपक वानरे,**

**वय : १२ वर्ष , धंदा: शिक्षण,**

**रा. बकुपिंपळगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर**

प्रश्न क्र. १-तु कोणत्या वर्गात शिकते?

उत्तर- इयत्ता आठवी.

प्रश्न क्र. २- खोटे बोलणे चांगले असते का वाईट ?

उत्तर- वाईट.

प्रश्न क्र. ३ -नेहमी आपण खरे बोलले पाहिजे हे तुला माहिती आहे का?

उत्तर- होय

प्रश्न क्र. ४ - खोटे बोलल्याने काय होते ?

उत्तर- चांगले नसते.

सदर प्रश्नावरुन साक्षीदाराला विचारलेल्या प्रश्नांची योग्य ती उत्तरे देण्याची समज असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही शपथ न देता खालीलप्रमाणे नोंदविण्यात आली.

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरु :**

मी त्रिमुर्ती शाळेमध्ये आहे. मी इंग्लिश माध्यमातुन सी.बी.एस.सी. पॅटर्नमध्ये शिकते. आमच्या घरात मी, माझे आई जयश्री, वडील दिपक, आज्जी व्दारकाबाई, बहिण प्रांजल, भाउ अजय असे मिळुन राहतो. दि. २४/१२/२०२३ रोजी सांयकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मी व माझा भाउ प्रवरा संगम येथे पाणी आणण्यासाठी जात होतो. मी व माझा भाउ जात असताना संदीप काकाने आमचा रस्ता आडवला. त्यामुळे आम्ही आईला बोलविले. त्यामुळे संदीप काकाने आईला लोटुन दिले. संदीपकाका म्हणाला की, आमचा रोड आहे, तुम्ही येथुन जायचे नाही, डबल आलात तर तंगडे तोडुन देईल. त्यानंतर आमचे वडील आल्यानंतर आम्ही वडीलांना घटनेबाबत सांगितले. त्यानंतर माझ्या आई-वडीलांनी जाउन पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण,**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ ॲड श्री. एल. डी. घावटे यांचे मार्फत सुरु-**

माझा भाउ अजय त्रिमुर्ती शाळेमध्ये जात होता परंतु तो आता शाळेत जात नाही. माझी बहिण प्रांजल इयत्ता अकरावी मध्ये बेल्हेकर कॉलेजमध्ये जाते. पाणी आणण्यासाठी कधी-कधी माझी बहिण जात असे. पाणी आणण्यासाठी आम्ही मोटार सायकलवर जात असत. हे म्हणणे खरे आहे की, दि. २४/१२/२०२३ रोजी सर्व जण घरीच होते. हे म्हणणे खरे आहे की, आमची शेती घरा जवळच आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील बाहेर कोठेच कामासाठी जात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, संदीप काकाचे व माझ्या आई-वडीलांचे रस्त्यावरुन नेहमीच भांडण होतात. हे म्हणणे खरे आहे की, संदीप काका गावात राहतात. हे म्हणणे खरे आहे की, संदीपकाका कधीमध्ये शेतात येतात. हे म्हणणे खरे आहे की, संदीपकाका जेंव्हा केंव्हा शेतात येतात ते सकाळीच येतात. हे म्हणणे खरे आहे की, संदीपकाका सकाळी शेतातील काम करुन त्यांच्या घरी निघुन जातात. माझे वडील त्यादिवशी सांयकाळी ५.३० वाजता घरी आले होते व माझे आई-वडील सांयकाळी ६.०० वाजता पोलिस ठाण्यात गेले. घटनेच्या दिवशी माझे वडील वावरात होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही आमच्या शेतात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, आमची शेती आमच्या घ ाराजवळ आहे. माझे आई-वडील पोलिस ठाण्याहुन सांयकाळी सात वाजता घरी आले. त्यानंतर माझे आई-वडील पोलिस स्टेशनला कधी गेले हे मला माहिती नाही. मी व अजय पोलिस स्टेशनला कधी गेलो हे मला माहिती नाही. आम्ही पोलिस स्टेशनला गेलो होतो. आम्ही पोलिस स्टेशनला घटनेनंतर आठ दिवसांनी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनला गेलो नाही. हे मला माहिती नाही की, पोलिस आमच्या वस्तीवर आले होते. आमच्या शाळेला नाताळाच्या सुट्ट्या नसतात. हे म्हणणे खरे नाही की, संदीपकाका एकदा घरी गेले की, पुन्हा शेताकडे येत नाहीत. मी पोलिसांना जबाब देत असताना असे सांगितले की, संदीपकाकाने मम्मीला लोटुन दिले. हे मला माहिती नाही की, संदीपकाकाने माझ्या वडीलांवर केसेस केलेल्या आहेत. आम्ही जारचे पाणी रोज आणत नाहीत. आम्ही दोन-चार दिवसातुन जारचे पाणी आणतो. आमच्या मोटार सायकलचा क्रमांक मला माहिती नाही. रस्त्याच्या आवती-भोवती घरे आहेत. साक्षीदार स्वतहुन सांगते की, लांब आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावरुन संदीपकाका व माझ्या आई-वडीलांचे नेहमीच वाद होतात. आम्ही घरापासुन अर्धा किलोमिटर अंतरावर गेल्यानंतर आम्हाला संदीप काकाने आडवले. आम्ही आवाज दिल्यानंतर फक्त मम्मी आली व आज्जी व प्रांजल घरी होत्या. हे मी सांगु शकत नाही की, आज्जी व प्रांजल घराबाहेर आल्याच नाहीत. मम्मीला माझ्या भावाने आवाज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाउ पाणी आण्यासाठी प्रवरासंगम येथे जात होतो असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, संदीपकाका आम्हाला म्हणाले की, डबल येथुन आलात तर तुमचे

तंगडे तोंडुन टाकीन हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आम्ही आईला आवाज दिला, आई तेथे आल्यानंतर संदीपकाकाने आईला लोटुन दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पप्पा घरी आल्यानंतर आम्ही पप्पांना घटनेबाबत सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पप्पाचे व संदीप काकाचे रस्त्यावरुन वाद असल्यामुळे वडीलांचे सांगण्यावरुन माझ्या मम्मीने केस दाखल केली. साक्षीदार स्वतहुन सांगते की, मम्मीने रस्त्याचे वाद असल्यामुळे केस दाखल करायची असे सांगितले होते.

**उलटतपास पुर्ण,**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.09.25 15:18:18 +0530

दिनांक :- २५/०९/२०२५

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नेवासा